|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## नामकरण [बारसे]

बाळाच्या जन्मानंतर होणारा पहिला संस्कार म्हणजे नामकरण विधी असे म्हणता येऊ शकते. खरे म्हणजे जन्मानंतर लगेचच जातकर्म संस्कार करण्याचे विधान आहे, परंतु वर्तमान परिस्थितीत ते व्यवहारात आणलेले दिसत नाही. आपल्या पद्धतीत त्याचे तत्व देखील नामकरण विधीत समाविष्ट केलेले आहे. या संस्काराच्या माध्यमातून शिशु रुपात अवतरलेल्या जीवात्म्याला कल्याणकारी यज्ञाच्या वातावरणाचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात येतो. त्या जीवाजवळ पूर्वीच्या संस्कार संचायापैकी जे हीन आहेत, त्यांच्यापासून मुक्त करणे आणि जे श्रेष्ठ आहेत त्यांचे आभार मानाने अभिष्ट असते. नामकरण संस्काराच्या वेळी बालकाच्या अंतरात मौलिक कल्याणकारी प्रवृत्ती आणि आकांक्षा यांची स्थापना, जागरणाच्या सूत्रांचा विचार करत त्यांच्या अनुरूप असे वातावरण तयार झाले पाहिजे. बालक मुलगा आहे की मुलगी, या भेदभावाला तिथे जागा असता कामा नये. भारतीय संस्कृतीत कोठेही अशा प्रकारचा भेद नाहीये. शीलवती कन्येला दहा पुत्रांच्या समान मानले गेले आहे.

'दश पुत्र-समा कन्या यस्य शीलवती सुता,'<br>
याच्या विरुद्ध पुत्र देखील कुल धर्म नष्ट करणारा असू शकतो.<br>
जिमि कपूत के ऊपजे कुल सद्धर्म नसाहि.'

त्यामुळेच मुलगा किंवा मुलगी कोणीही असो, त्याच्या अंतरातील वाईट संस्कारांचे निवारण करून श्रेष्ठत्वाच्या दिशेला त्याचा प्रवाह निर्माण करण्याच्या दृष्टीने नामकरण संस्कार केला गेला पाहिजे. हा संस्कार केला जात असताना बाळाचे आप्त, हितचिंतक आणि उपस्थित व्यक्ती यांच्या मनात बाळाला जन्म देण्या व्यतिरिक्त त्यांना श्रेष्ठ व्यक्तित्व संपन्न बनवण्यासाठीचे महत्त्व निर्माण होते. भाव भरलेल्या वातावरणात प्राप्त सूत्र कार्यान्वित करण्याचा उत्साह जागतो. सामान्यतः हा संस्कार जन्मापासून ११,१२,१३ दिवशी केला जातो. त्याच दिवशी सुवेराचे निवारण आणि शुद्धीकरण देखील केले जाते. जर प्रसूती घरातच झाली असेल तर त्या कक्षाला झाडून, धुवून- पुसून स्वच्छ केले पाहिजे. बाळ आणि त्याची माता दोघांनाही स्नान करवून स्वच्छ वस्त्र घातली जातात. या सर्वासोबतच यज्ञ आणि संस्काराचा क्रम वातावरणात दिव्यता मिसळून अभिष्ट उद्देशाची पूर्तता करतो. जर काही कारणामुळे दहाव्या दिवशी नामकरण संस्कार करता आला नाही, तर नंतर एखाद्या दिवशी हा संस्कार संपन्न केला पाहिजे. घर, प्रज्ञा संस्थाने अथवा यज्ञ स्थळे या ठिकाणी देखील हा संस्कार करून घेणे योग्य आहे. जगामधे बालकास एक विशिष्ट अधिष्ठान प्राप्त व्हावे हा या संस्कारामागील हेतू आहे. या संस्काराबरोबरच "कर्णवेध" हा संस्कार देखील करतात. अंतर्गळ, अंडवृद्धी या सारखे रोग टळावेत, मानसिक स्वास्थ्य वाढीस लागावे तसेच स्मरणशक्ती वाढीस लागावी हा या संस्कारा मागील हेतू आहे.

### नामकरण संस्काराचा मुहुर्त

जन्मापासून ११ व्या, १२ व्या दिवशीं जर कांहीं अडचण आली तर १०१ व्या दिवशीं किंवा २ ऱ्या वर्षाच्या आरंभी जन्म तिथीस, नेमलेल्या दिवशीं नामकरण करावें. त्या दिवशीं जर भद्रा, वैधृति, व्यतीपात, ग्रहण, संक्रांति, आमावास्या, श्राद्धदिवस असेल तर नामकरण करूं नये, परंतु मलमास, गुरु शुक्राचे अस्त इत्यादिकांचा दोष नाहीं. मुख्य काल टळून गेला असतां ज्योतिषशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें शुभ, तिथि, शुभ नक्षत्र इत्यादिक अवश्य पहावें. नामकरण संस्कार प्रातःकाली करावा पुष्य, हस्त, चित्रा, स्वाति, अनुराधा, मृग, ज्येष्ठा, तिन्ही उत्तरा हीं नक्षत्रे तसेंच वृषभ, सिंह, कुंभ, वृश्चिक ही लग्नें आणि रवि, बुध, गुरु, शुक्र, हें वार नांव ठेवण्यास उक्त आहेत. रिक्ता तिथ्यादि व दुष्टयोगादि वर्ज करावे. जातकर्म, नामकरण तसेच बाळाला जन्मवेळी नक्षत्र किंवा योग इ. शांती असल्यास, ते कर्म करण्यासाठी ती स्त्री शुद्ध असते, पण इतर कोणतेही देवकर्म करायचे असल्यास शास्त्राधारे मुलगा झाल्यास ३० दिवस व मुलगी झाल्यास ४० दिवसांनी मातेची शुध्दी होते.

### स्वरूप

बारसे या नावाने महाराष्ट्रात प्रचलित असलेला हा संस्कार सामान्यतः जन्मानंतर बाराव्या दिवशी साजरा करतात. पण स्मृतिग्रंथांनी विहित केलेला वैदिक विधी मात्र केला जात नाही. जन्मसमयीची ग्रहदशा व ज्योतिषशास्त्रीय परिस्थिती लक्षात घेऊन शुभ नाम शोधण्यासाठी ब्राह्मण पुरोहिताचा सल्ला घेतात. ह्या समारंभास प्रामुख्याने महिलांना आमंत्रण देतात. सर्व महिला बालकासाठी भेटवस्तू आणतात. ग्रॅनाईट दगडाच्या वरवंट्याला तेल लावून पाळण्यात ठेवतात. आपल्या अर्भाकास हातात घेऊन आई पाळण्याच्या एका बाजूला उभी राहाते आणि समोरच्या बाजूच्या महिलेस " कोणी गोविंद घ्या, कोणी गोपाळ घ्या" असे म्हणते. समोरची महिला वरवंटा हातात घेते आणि मुलाला प्रथमच पाळण्यात घातले जाते. आई मुलाला द्यावयाचे शुभ नांव प्रथम त्याच्या कानात कुजबुजते आणी नंतर आमंत्रितांसमोर घोषित करते. सर्व महिला मग बालक झोपी जाण्यास्तव 'पाळणा' गीत म्हणतात. अभ्यागतांना अल्पोहार व घुगऱ्या दिल्यावर नामकरण विधी समाप्त होतो.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**<br>
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,<br>
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**<br>
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar<br>
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com